महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगास योजनांतर्गत बाबींकरिता सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील निधी वितरीत करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक:-अविवि-२०१७/प्र.क्र.७४ (भाग-१)/का-९
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १३ मार्च, २०१८.

वाचा:- (१) शासन परिपत्रक , वित्त विभाग क्र. अर्थसं- २०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.०४.२०१७ व दि.०६.०२.२०१८

(२) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.३०.०६.२०१७

(३) महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे पत्र क्र.राअआ/लेखा/प्र.क्र.१/का-४/२०१७-१८, दि.३०.११. २०१७.

(४) शासन निर्णय क्रमांक अविवि-२०१७/प्र.क्र.७४/का.-९, दि.२६.०५.२०१७, दि.०४.०८.२०१७ व दि.१८.१२.२०१७.

प्रस्तावना

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई या कार्यालयास अल्पसंख्याक समाजातील उमेदवारांसाठी (१) पोलीस शिपाई भरतीपूर्व प्रशिक्षण वर्ग योजना, (२) मराठी भाषा फाऊंडेशन वर्ग योजना, (३) केंद्रीय लोकसेवा आयोग परीक्षा प्रशिक्षण वर्ग योजना (यशदामार्फत) व (४) स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण योजना (राज्य प्रशासकीय सेवा प्रशिक्षण संस्थेमार्फत) या योजनांकरिता सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील माहे एप्रिल, २०१७ ते जुलै, २०१७ या चार महिन्यांचा खर्च भागविण्याकरिता उपरोक्त क्र.(३) येथील दिनांक २६.०५.२०१७ च्या शासन निर्णयान्वये रु.१,६६,६६,६६८/- (रुपये एक कोटी सहासष्ट लाख सहासष्ट हजार सहाशे अडुसष्ट फक्त) मंजूर निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच माहे ऑगस्ट, २०१७ ते नोव्हेंबर, २०१७ या चार महिन्यांचा खर्च भागविण्याकरीता करीता उपरोक्त क्रमांक ३ येथील दिनांक ०४.०८.२०१७ च्या शासन निर्णयान्वये, रु.१,६६,६६,६६८/- (रुपये एक कोटी सहासष्ट लाख सहासष्ट हजार सहाशे अडुसष्ट फक्त) मंजूर निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच माहे डिसेंबर, २०१७ करीता उपरोक्त क्रमांक ३ येथील दिनांक १८.१२.२०१७ च्या शासन निर्णयान्वये, रु.१६,६६,६६४/- (अक्षरी रुपये सोळा लक्ष सहासष्ठ हजार सहाशे चौसष्ठ फक्त) इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. आता उर्वरित निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगास "मागणी क्रमांक झेडई-१, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाजकल्याण २०० इतर कार्यक्रम राज्य योजनांतर्गत योजना (०१) (१७) राज्य अल्पसंख्याक आयोग (योजनांतर्गत) (२२३५ ए २५८), ३१ सहायक अनुदान (वेतनेतर)" या लेखाशीर्षांतर्गत सन २०१७-१८ करिता रु. पाच कोटी एवढा निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. माहे एप्रिल, २०१७ ते डिसेंबर, २०१७ करिता सदर मंजूर निधीच्या ८० % निधी मर्यादेपर्यंत वितरीत करण्यासाठी उपरोक्त क्र. १ येथील शासन परिपत्रकान्वये मान्यता देण्यात आलेली होती. मात्र त्यानंतरच्या दि.३० जून, २०१७ च्या परिपत्रकान्वये सदर मर्यादा ७०% करण्यात आली होती. आता वित्त विभागाच्या दिनांक ०६.०२.२०१८ च्या परिपत्रकान्वये, ८०% मर्यादेत निधी वितरीत करण्यास अनुमती आहे. त्यास अनुसरून तसेच संदर्भ क्र.३ येथील पत्रान्वये महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाने योजनांतर्गत बाबीसाठी निधी वितरणाची मागणी केलेली आहे. त्यानुसार रु.५०,००,०००/- (अक्षरी रुपये पन्नास लक्ष फक्त) इतके अनुदान महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई यांच्याकडे सुपूर्द करण्यात येत आहे. सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग यांनी खर्च विहीत मर्यादेत राहील याची दक्षता घ्यावी. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात योजनांतर्गत बाबीसाठी खालीलप्रमाणे वेतनेतर अनुदान मंजूर करण्यात येत आहे.

"मागणी क्रमांक झेडई-१, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाजकल्याण २०० इतर कार्यक्रम राज्य योजनांतर्गत योजना (०१) (१७) राज्य अल्पसंख्याक आयोग (योजनांतर्गत) (२२३५ ए २५८), ३१ सहायक अनुदान (वेतनेतर)"			
			मंजूर अनुदान
अ. क्र.	तपशीलवार लेखाशीर्ष	सन २०१७-१८ साठी अर्थ संकल्पीय अंदाज पुस्तिकेत दर्शविण्यात आलेले अनुदान	
१	२२३५-ए-२५८	रु.५,००,००,०००/-	रु.५०,००,०००/-
	एकूण		रु.५०,००,०००/- (अक्षरी रुपये पन्नास लक्ष फक्त)

२. सदर तरतूद सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई यांच्याकडे सुपूर्द करण्यात येत असून याकरिता ते आहरण व संवितरण आणि नियंत्रक अधिकारी म्हणून काम पाहतील. महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाने सन २०१७-१८ च्या मासिक निधी विवरण पत्रात दर्शविल्याप्रमाणे आपल्या कार्यालयाचा खर्च विहित मर्यादेपर्यंतच करावा. या आदेशान्वये वितरित करण्यात आलेल्या रकमेतून केलेल्या खर्चाचा तपशील, उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) तसेच संदर्भ क्र.१ शासन परिपत्रक, वित्त विभाग अन्वये विहीत अटी व तरतुदींचे पालन महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाने करावे.

३. उपरोक्त रक्कम "मागणी क्रमांक झेडई-१, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाजकल्याण २०० इतर कार्यक्रम राज्य योजनांतर्गत योजना (०१) (१७) राज्य अल्पसंख्याक आयोग (योजनांतर्गत) (२२३५ ए २५८), ३१ सहायक अनुदान (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावी.

४. " सदर शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८ भाग पहिला, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र २०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दि. १७ एप्रिल, २०१५ अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त झालेल्या अधिकारांतर्गत किंवा त्या त्या विभागास वेळोवेळी वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-२ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार तसेच शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/ अर्थ-३, दि. १८ एप्रिल, २०१७ मधील परिच्छेद ७ ते १८ येथील अटींची व त्यासोबतच्या परिशिष्टांमधील अ.क्र. ३ व ९ मधील अटींची पुर्तता होत असून प्राप्त मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे. "

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३१३१७२११९३७१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Dinesh M. Sonavane

Digitally signed by Dinesh M. Sonavane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9cabb099fd0576208f4caa310d2e7860201ab5363a2133e0927ff26c0f016fdf, 2.5.4.45=032100CD9D66225CED8BAE27E0E1249D39EC14A54419D0A13504B49333B23F92B58199, cn=Dinesh M. Sonavane
Date: 2018.03.13 17:55:39 +05'30'

(दि.मा.सोनवणे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपालांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्र्यांचे अ.मु. सचिव,
३) मा.मंत्री / मा.राज्यमंत्री (अविवि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
५) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
६) महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर,
७) संचालक, लेखा व कोषागारे
८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
९) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१०) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
११) सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई,
१२) कक्ष अधिकारी (का. ७ व ८), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३) निवडनस्ती (कार्यासन-९)